‘‘प्रेसनोट’’

**‘‘ wizard traders 7 च्या नावाने खोटे फेसबुक पेज तयार करून त्याचे माध्यमातून जास्त नफा मिळवून देण्याच्या अमिषाने ऑनलाईन फसवणूक करणाऱ्या ०२ मुख्य आरोपींना जयपूर राजस्थान येथून जेरबंद केलेबाबत’’**

ओशिवरा पोलीस ठाणेच्या हद्दीत राहणाऱ्या तक्रारदार पिडीत महिला या दिनांक १२/०७/२०२६ रोजी त्यांच्या मोबाईलद्वारे फेसबुकवर सर्फिग करत असताना त्यांना एक फेसबुक पेज भेटले. सदर पेज हे wizard traders 7 या नावाने बनविण्यात आले होते त्याचा URL https://facebook-com/1221162594405776 असा होता, त्यांनी वर नमुद पेजवर एक पोस्ट केली होती. त्यामध्ये आरोपी इसमांनी सांगितले की, ९९ रू. भरल्यावर ९९९९ रू. मिळणार असे लिहलेले होते. फिर्यादी यांनी सदर वेब पेज क्लिक केले असता ८४२६९६५९२३ या व्हॉट्सअप नंबर वरून त्यांना हाय असा मॅसेज आला. सदर नंबरवरून एका अनोळखी इसमाने फिर्यादी याचेकडे असणाऱ्या स्किमची माहिती दिली. फिर्यादी यांनी त्यातील ९९ रु असणारी स्किम घेणार असल्याबाबत सांगुन त्यांनी त्याने पाठवलेल्या क्यूआर कोड वर ९९ रु गूगल पे मार्फत पाठविले व त्याचा स्क्रिनशॉट त्यास पाठवला. त्यानंतर आरोपी याने दिनांक १३/०७/२०२६ रोजी रात्री ०३.३० वाजे पर्यंत फिर्यादी यांचेकडून विविध मोबाईल क्रमांकावरुन संपर्क करून वेगवेगळी कारणे सांगुन फिर्यादी यांना त्यांच्या खात्यातुन विविध खात्यावर एकुण २२ ट्राझेक्षन करण्यास भाग पाडुन त्यांची एकुण ७३,५२१/- रु ची आर्थिक फसवणुक केली म्हणून फिर्यादी यांनी ओशिवरा पोलीस ठाणेस दिलेल्या तक्रारीवरुन गु.नों.क्र. १०२०/२०२६ कलम ३१८ (४), ३१९(२) बी एन एस सह कलम ६६(क), ६६(ड) आय टी ॲक्ट २००० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

नमुद गुन्हयातील फिर्यादी यांनी दिलेल्या जबाबानुसार पाहीजे आरोपीताने गुन्हयात वापरलेले फेसबुक पेज wizard traders7 या फेसबुक खात्याची माहिती घेतली असता. नमुद गुन्हा करणारे दोन मुख्य आरोपी निष्पन्न करून खालील नमुद आरोपी यांना ओशिवरा पोलीस ठाणे, मुंबई च्या सायबर पथकाने मागील ०४ दिवसांपासून राजस्थान राज्यातील जिल्हा जयपूर, जिल्हा दौसा येथे पाठलाग केला असता ते वेळोवेळी त्यांचे राहते ठिकाण हे बदलत होते. आरोपीना अंत्यंत शिताफिने सापळा रचून स्थानिक पोलीस ठाणे, शिवदास पुरा, दक्षिण जयपूर, राज्य राजस्थान येथून स्थानिक पोलीसांच्या मदतीने अटक करण्यात आली. आरोपींना मा. रेल्वे मोबाईल कोर्ट, अंधेरी यांचे समक्ष हजर केले असता त्यांना दि. ०७/०९/२०२६ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड दिलेला आहे. आरोपी यांचेकडून गुन्हयाशी निगडीत खालील नमुद मालमत्ता मिळून आली. १) ०२ आय फोन कंपनीचा मोबाईल अं. कि ७०,००० /- रु २) ०१ ओपो कंपनीचा मोबाईल अं. कि. १०,०००/-रू. ३) वेगवेगळया मोबाईल कंपनीचे एकुण ११ जुने वापरलेले सिमकार्ड्स ४) ०१ एन एस डी एल बॅंकेचे डेबीटकार्ड क्र. ८१७६६५०१०४६०८०३२ ५) ०१ पेटीएम कंपनीचे क्युआर स्कॅनर्स त्याचा युपीआय आय डी paytm.s2gotdq@pty

आरोपींची नावे पुढीलप्रमाणे

१) दिपक सिताराम मिना, वय २१ वर्षे, व्यवसाय नाही. पत्ता- तालाब गाव, ता. लालसोट, जि. दौसा, राज्य राजस्थान

२) हरकेश गोपाल मिना, वय ३० वर्षे, व्यवसाय नाही, रा.ठी. जापदा कालन, ता. कोठावडा, जि. जयपूर राज्य राजस्थान सध्या दोघेही रा.ठी. प्लॉट नं. २०७, मानविहार विस्तार, बडी का बास, सितापुरा, जयपूर, राजस्थान.

सदरची यशस्वी कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त सो, उत्तर प्रादेशिक विभाग, मा. पोलीस उप आयुक्त सो, श्री. पुरुषोत्तम कराड, उत्तर परिमंडळ ०१, स.पो.आ. श्री. विनायक चव्हाण (ओशिवरा विभाग), यांच्या मागदर्शनाखाली ओशिवरा पोलीस ठाणे व.पो.नि. संजय चव्हाण, पो.नि.(सायबर) प्रभात मानकर, पो.नि.(गुन्हे) सचिन पाटील, पो.उप.नि. विजय सरदेसाई, स. फौ. अशोक कोंडे, पो.शि विक्रम सरनोबत, पोशि सुहास शिंदे यांनी पार पाडली.